# समाजहितासाठीच माहितीचा अधिकार वापरा : ॲड. पवार

तभा वृत्तसेवा

**खामगाव, १२ ऑक्टोबर**

येथील मोहता महिला महाविद्यालयात १० ऑक्टोबर रोजी जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त रासेयो तालुका विधिसेवा समिती व वकील संघ खामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने मानसिक आरोग्य व माहितीचा अधिकार या विषयावर मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले.



मार्गदर्शन करताना ॲड. पवार. उपस्थितांमध्ये प्राचार्या डॉ. त्रिवेणी सोनोने व इतर मान्यवर

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहदिवाणी न्यायाधीश जे. एस. कोकाटे होते. न्यायाधीश जे. जी. वाघ, वकील संघाचे अध्यक्ष पवार, सहायक सरकारी वकील देशमुख, सहायक सरकारी वकील राजेश्वरी आळशी, वकील संघाचे माजी सचिव व्यास, वकील संघाचे माजी उपाध्यक्ष ॲड. बी. शेख, रासेयो क्षेत्रीय समन्वयक डॉ.नागरिक, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.त्रिवेणी सोनोने प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

एम. बी. पवार यांनी माहितीचा अधिकार या विषयावर व्यावहारिक व सैद्धांतिक मार्गदर्शन करताना समाजहितासाठीच माहिती अधिकाराचा वापर झाला पाहिजे, असे सांगितले.

सहायक सरकारी वकील देशमुख व राजेश्वरी आळशी यांनी मानसिक तणाव कशा प्रकारे दूर करू शकतो, या विषयावर मार्गदर्शन केले. व्यास यांनी मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्याकरिता आपल्या सकारात्मक विचारांचा खूप मोठा वाटा आहे, यावर भर दिला. प्रा. डॉ. नागरिक यांनी मानसिक आरोग्य व माहितीचा अधिकार या दोन्ही विषयावर मत व्यक्त केले.

प्राचार्या डॉ. सोनोने यांनीही दोन्ही विषयांचे मार्गदर्शन विद्यार्थिनींसाठी वर्तमान युगात किती महत्वपूर्ण आहे, यावर विद्यार्थिनींचे लक्ष केंद्रीत केले. न्यायाधीश कोकाटे यांनी अध्यक्षीय भाषणातून मानसिक तणाव व माहितीचा अधिकार या विषयाची सखोल माहिती दिली.

कार्यक्रमाचे संचालन ॲड. बी. शेख यांनी केले. प्रा. छाया जाधव यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे आयोजन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. छाया जाधव व प्रा.ज्ञानेश्वर बोंपिलवार यांनी केले.

नॅशनल एज्युकेशन सोसायटी व्दारा संचालित

# श्रीमती सुरजदेवी रामचंद मोहता महिला महाविद्यालय, खामगांव. जि. बुलडाणा

**डॉ सौ त्रिवेणी ना. सोनोने** - प्राचार्य
हिन्दी साहित्यरत्न, एम.ए. एम.फिल. पीएच.डी

255160 (कार्यालय)
259776 (निवास)
मोबाईल - 9422323459

E mail : **srmm_nes@gmail.com**

नॅक व्दारा B+ श्रेणीने मानांकित

जावक क्रमांक : 330/सुरामो/2013

दिनांक :.19-10-2013

प्रती,
मा.माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
अमरावती विभाग,
अमरावती.

**विषय :– दि. 06 ते 12 ऑक्टोबर 2013 हा सप्ताह 'माहिती अधिकार सप्ताह' साजरा केल्याबाबत..**
**संदर्भ :– आपले पत्र क.संगाबाअवि / 151 / 35 / 2013 दि. 20–.9–2013**

महोदय,

वरील संदार्भीय प्राप्त पत्रानुसार श्रीमती सु.रा.मोहता महिला महाविद्यालय,खामगांव विभाग प्रमुखांनी महाविद्यालयात 'माहितीचा अधिकार' या विषयावर आधारित 'निबंध स्पर्धा, 'चित्रकला, ''व्याख्यान' आयोजित केले त्याचा अहवाल, वृत्तपत्राची कात्रणे,फोटो आपल्या माहितीस्तव सादर करीत आहे.

आपले विनीत

प्रा.डॉ.सौ.प्रेरणा सिंह (इंग्रजी विभाग प्रमुख)
प्रा.डॉ.सौ.मेधा देशपांडे (गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख)
प्रा.सौ.हेमा जवंजाळ( मराठी विभाग प्रमुख)
प्रा.डॉ.वसंत डोंगरे( इतिहास विभाग प्रमुख)
प्रा.श्री.विष्णु गुमटकर (अर्थशास्त्र विभाग प्रमुख)
प्रा.श्री.प्रवीण आळशी( संगीत विभाग)

आ.विश्वासू

Tsonon

( डॉ.सौ.त्रिवेणी सोनोने)

प्राचार्य
श्रीमती सु.रा.मोहता महिला
महाविद्यालय, खामगांव

सहपत्रे –

1.अहवाल
2.वृत्तपत्राची कात्रणे
3.फोटो

# अहवाल

श्रीमती सुरजदेवी रामचंद मोहता महिला महाविद्यालयात दि.06–10–13 ते 12–10–13 दरम्यान माहितीचा अधिकार सप्ताह साजरा करण्यात आला. त्याचा अहवाल खालील प्रमाणे

दि. 07–10–13 रोजी महाविद्यालय स्तरावर 'माहितीचा अधिकारी' या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. या निबंध स्पर्धेमध्ये एकूण 10 विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. परीक्षक म्हणून प्रा.डॉ.सौ.प्रेरणा सिंह व प्रा.हेमा जवंजाळ यांनी काम पाहिले. या निबंध स्पर्धेत पुढील विद्यार्थिनींना क्रमांक मिळाला.

| अ.क | विद्यार्थिनीचे नांव | कमांक | वर्ग |
|---|---|---|---|
| 1 | कु.सीमा सुरेश इंगळे | प्रथम | बी.ए.भाग–2 |
| 2 | कु.धनश्री रविंद्र पुंडलिक | दुसरा | बी.ए.भाग–1 |
| 3 | कु.सरीता अशोक निंबांळकर | तृतीय | बी.ए.भाग–3 |

तसेच दि. 08–10–13 रोजी ' माहितीचा अधिकार' या विषयावर 'चित्रकला स्पर्धा' आयोजित केली. या स्पर्धेत कु. सीमा सुरेश इंगळे हिने सहभाग नोंदविला.

दि.10–10–13 रोजी महाविद्यालयात 'माहितीचा अधिकार' या विषयावर खामगांव येथील वकिल संघ व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यान घेण्यात आले. या कार्यकमाचे अध्यक्ष प्रथम न्यायदंडाधिकारी वर्ग–1 सी. कोकाटे साहेब हे होते. तसेच क्षेत्रीय समन्वयक डॉ.नागरीक प्रमुख उपस्थिती मध्ये मा.प्राचार्या डॉ. सौ.त्रिवेणी सोनोने,श्री.एम.बी.पवार व अनेक वकिल उपस्थित होते. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थिनी कार्यकमाला उपस्थित होत्या. एम.बी.पवार हे मुख्य वक्ते होते. त्यांनी माहितीच्या अधिकाराविषयी सविस्तर माहिती विद्यार्थिनींना दिली. यावेळी अंदाजे 350 विद्यार्थिनी उपस्थित होत्या. यावेळी ॲड.श्री.व्यास, प्राचार्या डॉ. सौ. त्रिवेणी सोनोने, ॲड. देशमुख यांचीही भाषणे झालीत.

कार्यकमाचे संचलन ॲड.शेख यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.कु.छाया जाधव यांनी केले. कार्यकमाचे यशस्वी आयोजन प्रा.डॉ.सौ.मेधा देशपांडे, प्रा.डॉ.वसंत डोंगरे,प्रा.विष्णु गुमटकर यांनी केले. कार्यकमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी व परिसरातील अनेक नागरीक उपस्थित होते.

कार्यकमाच्या सप्ताह साजरीकरणाच्या यशस्वीतेसाठी प्रा.डॉ.सौ.प्रेरणा सिंह, प्रा.डॉ.सौ.मेधा देशपांडे,प्रा. सौ.हेमा जवंजाळ, प्रा.डॉ.वसंत डोंगरे, प्रा.विष्णु गुमटकर, प्रा.प्रवीण आळशी यांनी परीश्रम घेतले. कार्यकमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

TSonone

खामगांव

# Report

## Year 2013-14

**Sub :- Right to Information.**

On the occasion of World Psychological Health Day our college, NSS unit organized one day workshop in collaboration with District Advocate Committee, Khamgaon on 10th Oct 2013. The subject was right to information. Adv. Pawar was the resource person. Mr. J. S. Kokate , Judge, Civil Court Khamgaon chaired the workshop. Adv. Pawar told the participants the importance of Right to Information in the democracy. But he also told that it should be used for the betterment of the society and it should be used for constructive purpose. Adv. Smt. Rajeshwari Alshi explained in her speech the way to minimize the psychological stress. District co-ordinator of NSS unit Dr. Nagarik also expressed his views about Right to information and psychological health. Good number of students were presented in the workshop.

Bonde

PRINCIPAL
Smt. S. R. Mohata Mahila
Mahavidyalaya, Khamgaon